# प्रा. विजय नवले यांच्या सहा पुस्तकांचे प्रकाशन

मांजरी, ता. २१ : "डिप्लोमानंतर पुढे काय? आणि बरेच काही..." हे प्रा. विजय नवले यांचे पुस्तक अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना दीपस्तंभासारखे मार्गदर्शक ठरेल, असे मत डॉ. शिरीष केदारे यांनी व्यक्त केले.

लातूर येथे भरलेल्या 'डिपेक्स २००६' या अभियांत्रिकी पदविका राज्यस्तरीय प्रकल्प प्रदर्शनात डॉ. केदार यांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन झाले. त्या वेळी ते बोलत होते. या वेळी तंत्रशिक्षण विद्यार्थी परिषदेचे अमित वैद्य, प्रकाशक महेश नारके उपस्थित होते. या पुस्तकाच्या खरेदीसाठी विद्यार्थ्यांनी गर्दी केली होती. पहिल्याच दिवशी साडेतीनशे प्रती विकल्या गेल्या. या पुस्तकाबरोबरच प्रा. नवले यांनी लिहिलेल्या 'ओरल परीक्षेची तयारी, पेपर सोडविण्याचे तंत्र, प्रोजेक्टची तयारी, फिफ्टी मोस्ट कॉमनली आस्कड् क्वेशन इन इंटरव्हिव्यू, 'एटी-केटी विद्यार्थ्यांसाठी' या इतर पाच पुस्तकांचेही या वेळी प्रकाशन झाले.

## पुस्तकात काय आहे?

पहिल्यांदाच मराठीत लेखन झालेल्या या पुस्तकात पदविकेनंतरच्या करिअरसाठी वेगवेगळ्या वीस संधीबाबत माहिती आहे. उच्च शिक्षण, नोकरी, उद्योग व्यवसायाबाबतचे मार्गदर्शन यात आहे. याशिवाय मुलाखतीची तयारी आदी वेगळ्या परंतु गरजेच्या विषयावरील लेखनही यात केले आहे.




**लातूर** : डिपेक्स २००६ या अभियांत्रिकी प्रकल्प प्रदर्शनात प्रा. विजय नवले यांनी लिहिलेल्या 'डिप्लोमा नंतर पुढे काय? आणि बरेच काही...' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. शिरीष केदारे यांच्या हस्ते झाले. या वेळी प्रकाशक महेश नारके, तंत्रशिक्षण विद्यार्थी परिषदेचे अमित वैद्य उपस्थित होते.

22/02/0६ दै. सकाळ.